**कामगार आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई.**

**विषय: महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या दि.०१.१०.२०१५ रोजी संपन्न झालेल्या बैठकीचे इतिवृत्तांत.**

दि. ०१.१०.२०१५ रोजी दु. ३.०० वाजता महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची बैठक कामगार आयुक्त कार्यालय, कामगार भवन, बांद्रा (पूर्व), मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मा.श्री. ओमप्रकाश यादव | : | अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ,मुंबई. |
| २. | कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य मुंबई. | : | शासकीय प्रतिनिधी |
| ३. | मा.सहसचिव कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई. | : | शासकीय प्रतिनिधी |
| ४. | मा. संचालक, (लेखा व कोषागारे), महाराष्ट्र राज्य मुंबई. | : | शासकीय प्रतिनिधी |
| ५. | श्रीमती. मेघा धवल आपटे | : | मालक प्रतिनिधी |
| ६. | श्री. सतीश मगर | : | मालक प्रतिनिधी |
| ७. | श्री. अशोक गोविंदराव भुताड | : | कामगार प्रतिनिधी |
| ८. | श्री. श्रीपाद कुटासकर | : | कामगार प्रतिनिधी |
| ९. | श्री. विजय देवरुखकर | : | कामगार प्रतिनिधी |

बैठकीच्या सुरुवातीस सहायक कामगार आयुक्त तथा सचिव यांनी महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे मा.अध्यक्ष, शासन प्रतिनिधी, मालक प्रतिनिधी व कामगार प्रतिनिधींचे स्वागत केले. बैठकीत चर्चा करावयाच्या विषयांसंबंधीच्या कागदपत्रांचा संच सर्व मान्यवर सदस्यांना वितरित करण्यात आला.

सर्वप्रथम मा. अध्यक्ष महोदयांनी बैठकीचे कोरम पूर्ण झाल्याची खात्री करुन बैठकीस उपस्थित असलेल्या सर्व सदस्यांचे स्वागत केले.

बैठक सुरु होण्यापूर्वी राष्ट्रीय सुरक्षा परिषद, विदर्भ ॲक्शन सेंटरचे बांधकाम कामगारांच्या सुरक्षा उपायांबाबत मा. श्री. श्रीकांत देशपांडे यांनी सादरीकरण केले.

त्यानंतर बैठकीत खालीलप्रमाणे विषयनिहाय चर्चेस सुरुवात करण्यात आली.

## बैठकीची विषयसूची

### विषय क्र. १) : मागील बैठकीचे इतिवृत्तांत कायम करणे.

दि.२६.०८.२०१५ रोजी संपन्न झालेल्या बैठकीचे इतिवृत्तांस सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

### विषय क्र. २) : महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामधील नोंदित बांधकाम कामगारांसाठी काढावयाच्या आरोग्य विमा योजनेच्या ई-निविदेच्या अटी व शर्ती ठरविणे.

मंडळातील नोंदित बांधकाम कामगारांसाठी काढावयाच्या आरोग्य विमा योजनेची ई-निविदा अद्याप का काढण्यात आली नाही, अशी विचारणा मा. अध्यक्षांनी केली. यावर मा. कामगार आयुक्त यांनी असे सांगितले की, मंडळाच्या दि.१५.०७.२०१५ रोजी पार पडलेल्या बैठकीमध्ये इन्शुरन्स कंपनीची निविदा काढणेबाबत ठराव झालेला आहे. तथापि, सदर योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी इन्शुरन्स ब्रोकरची नियुक्ती करावी, असे पत्र मा. अध्यक्षांनी दिलेले असल्याने त्याबाबतचा ठराव आजच्या बैठकीत झाल्यानंतर सदर ई-निविदा प्रक्रीयेस सुरुवात करता येईल. याबाबत मा. अध्यक्षांनी असे सांगितले की, इन्शुरन्स ब्रोकर नियुक्त केल्यास सदर ब्रोकरला मंडळास कुठल्याही प्रकारची रक्कम देण्याची आवश्यकता नाही. इन्शुरन्स कंपनीमार्फत त्यांना कमिशन दिले जाते. तसेच, इन्शुरन्स ब्रोकर असल्यास क्लेम सेटल होण्यास मदत होऊ शकेल. इन्शुरन्स ब्रोकर नियुक्त केल्यास मंडळावर कोणताही आर्थिक बोजा येत नसून कामगारांचे विमा दावे सेटल होण्यास मदतच होऊ शकेल. याबाबत सविस्तर चर्चा होऊन सर्वानुमते इन्शुरन्स ब्रोकर नियुक्तीची ई-निविदा काढून नियुक्ती करावी, असे ठरले.

इन्शुरन्स ब्रोकर नियुक्तीसाठी (आरोग्य विमा विषयक) अटी / शर्ती ठरविणे व (आरोग्य विमा विषयक) यासाठी मंडळाचे अध्यक्ष, कामगार आयुक्त आणि संचालक (लेखा व कोषागरे ) यांची उपसमिती गठीत करण्यात यावी, असे सर्वानुमते ठरले. सदर उपसमितीने तात्काळ अटी व शर्ती ठरवून ७ दिवसात आरोग्य विमा विषयक ई-निविदा काढावी, असे मा. अध्यक्ष यांनी सांगितले.

**विषय क्र. ३) : महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामध्ये बांधकाम कामगारांची नोंदणी बाहय यंत्रणेद्वारे करुन घेण्यासाठी ई-निविदेच्या अटी व शर्ती ठरविणे.**

सदर विषयावर बोलताना मा. अध्यक्ष असे म्हणाले की, बांधकाम कामगारांची नोंदणी बाहय यंत्रणेद्वारे करुन घेणे व विषय सूचीतील विषय क्र.५ अंतर्गत फॅसिलिटेशन सेंटर उभारणे या दोन्ही गोष्टीही सारखेच असल्याने यापैकी एकच योजना राबविण्यात यावी. यावर मा. कामगार आयुक्त असे म्हणाले की, विषय क्र. ३ हा बांधकाम कामगारांच्या नोंदणी संदर्भात माहिती व कागदपत्रे कन्स्ट्रक्शन साईट वर जाऊन जमा करणे, ते संबंधीत अधिका-याकडे पोहचविणे, सदर माहिती व कागदपत्रे मंडळाच्या सॉफटवेअर एप्लीकेशन वर अपलोड करणे इ.शी संबंधित आहे. तथापि, विषय क्र.५ हा मंडळांतर्गत फॅसिलिटेशन सेंटर उभारण्याबाबत आहे. त्यामध्ये मंडळ भाडयाने अथवा मालकीची जागा प्रत्येक जिल्हा स्तरावर प्रत्येक महानगरपालिका झोनमध्ये व सर्व नगरपालिकांच्या ठिकाणी घेऊन फॅसिलिटेशन सेंटर उभारेल. अशा फॅसिलिटेशन सेंटरमध्ये एक सहायक कामगार आयुक्त, एक सरकारी कामगार अधिकारी व कंत्राटी पध्दतीने ७/८ कर्मचारी भरले जातील. तसेच फॅसिलिटेशन सेंटर मधील बांधकाम कामगार त्यांच्या सोयीनुसार नोंदणीविषयक अथवा योजनांसंबंधी शंकेचे निरसन करु शकतील. त्याप्रमाणे सदर फॅसिलिटेशन सेंटरद्वारे बांधकाम कामगारांना मंडळाच्या योजनांचा लाभ देखील प्रदान करता येऊ शकेल. मा.कामगार आयुक्त असेही म्हणाले की, मा.प्रधान सचिव दिल्ली येथे केंद्र शासनाने आयोजित केलेल्या बैठकीस गेले असता त्यांनी असे फॅसिलिटेशन सेंटर उभारण्याबाबत केंद्र शासनाच्या मा. सहसचिवांशी चर्चा केली आहे. यापूर्वीच्या बैठकीत ठरल्याप्रमाणे फॅसिलिटेशन सेंटर उभारण्याबाबत प्रस्ताव मान्यतेस्तव केंद्रशासनाचे मा. सहसचिव यांना दि.२७.०८.२०१५ रोजी पाठविण्यात आला आहे.

बांधकाम कामगारांच्या नोंदणीसंबंधी माहिती प्रत्यक्ष बांधकामावर जावून जमा करण्याचे काम बाहययंत्रणेद्वारे करुन घेणे हे देखील तितकेच महत्वाचे आहे. यामध्ये ई-निविदाद्वारे कंपनीची नियुक्ती करुन सदर कंपनीमार्फत बांधकाम कामगारांना नोंदणीविषयक माहिती, बायोमेट्रीक ओळखपत्र वाटप करणे इत्यादी कामे करुन घेता येतील व सदर कंपनीस ओळखपत्राच्या वाटपानुसार देयक प्रदान करण्यात येईल, असेही ते म्हणाले. तसेच सदर योजना शासन स्तरावरुन मान्यता मिळालेली असल्यामुळे मंडळातंर्गत नोंदणी वाढविण्याची ही चांगली संधी असल्याचेही मा. कामगार आयुक्त यांनी नमूद केले. यावर मा. अध्यक्ष यांनी सदर काम किती वेळात पूर्ण होईल अशी विचारणा केली त्यावर मा. कामगार आयुक्त असे म्हणाले की, सदर काम मोठे व टेकनीकल असल्याने यामध्ये IT

कन्सल्टंन्टची नेमणूक केल्यानंतर त्यांच्याकडून RFP डॉक्युमेंट बनवून घेण्यात येईल व त्यानंतर तीन आठवडयाचा कालावधी देऊन ई-निविदा प्रक्रीया सुरु करण्यात येईल. या सर्व कामास साधारण दोन महिन्यांचा कालावधी लागेल. असे मा. कामगार आयुक्त यांनी सांगितले. त्यास मा. संचालक (लेखा व कोषागारे) यांनी अनुमोदन दिले. त्यानुसार महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगारांची नोंदणीशी संबंधित माहिती जमा करण्याचे काम बाहय यंत्रणेद्वारे करुन घेण्यासाठी IT कन्सल्टन्टची नेमणूक करुन ई-निविदा काढण्यात यावी व सदर ई-निविदेच्या अटी व शर्ती देखील मा. अध्यक्ष, मा. कामगार आयुक्त व मा. संचालक (लेखा व कोषागारे) यांच्या उपसमितीने ठरवावे, असा सर्वानुमते ठराव करण्यात आला.

**विषय क्र. ४) : महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची माहिती पुस्तिका बनवून घेण्यासाठी कंपनीच्या नियुक्तीच्या अटी व शर्ती ठरविणे.**

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची माहिती पुस्तिका बनविण्यासाठी वरीलप्रमाणे कार्यवाही करुन ई-निविदा काढण्यात यावी, असे सर्वानुमते ठरले. सुरुवातीला सदर विषयाबाबत मा. संचालक (लेखा व कोषागारे) यांनी मंडळाच्या माहिती पुस्तिकेच्या किती प्रती छापून घ्यावयाच्या आहेत, अशी विचारणा केली. यावर मा. अध्यक्षांनी माहिती पुस्तिकांच्या एक लाख प्रती छापून सदर माहिती पुस्तिका राज्यातील सर्व लोकप्रतिनीधी, कामगार संघटना, कॉन्ट्रक्टर/बिल्डर्स डेव्हलपर, बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडिया, CREDAI, सर्व ग्रामपंचायती, सर्व जिल्हा परिषदांना इत्यादींना पाठविण्यात येतील, असे सांगितले. यावर कामगार प्रतिनिधी श्री. कुटासकर यांनी, एकत्रित एक लाख प्रती छापून घेण्यापेक्षा प्रथमत: केवळ पन्नास हजार प्रती छापून घेण्यात याव्यात व त्यांचे वाटप झाल्यानंतर उर्वरीत पन्नास हजार प्रती छापण्यात याव्यात, असे सुचविले. यावर मा.अध्यक्ष असे म्हणाले की, माहिती पुस्तिकांचे व्यवस्थित वाटप झाल्यास एक लाख प्रती देखील कमी पडतील. त्यामुळे माहिती पुस्तिकांच्या एक लाख प्रती छापणेच योग्य होईल. त्यानुसार मंडळाच्या योजनांच्या एक लाख माहिती पुस्तिका छापून घेण्याचा ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला. सदर बाबतही ई-निविदा प्रक्रीयेनेच कंपनीची नियुक्ती करावी व वरील उपसमितीने याही कामाच्या अटी व शर्ती ठरवाव्यात, असाही ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला.

**विषय क्र. ५) : महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गत फॅसिलिटेशन सेंटर्स उभारण्यासाठी कार्यवाही करणे.**

फॅसिलिटेशन सेंटर यावर बोलताना मा. कामगार आयुक्त असे म्हणाले की, यापूर्वी ठरल्यानुसार मंडळांतर्गत फॅसिलिटेशन सेंटर उभारण्याबाबत प्रस्ताव मा.प्रधान सचिव (कामगार) यांच्या सूचनेनुसार दि.२७.०८.२०१५ रोजी केंद्र शासनास पाठविण्यात आलेला आहे. त्यामध्ये प्रत्येक जिल्हाच्या ठिकाणी, प्रत्येक महानगरपालिकेच्या, प्रत्येक झोन मध्ये व प्रत्येक नगरपालिका क्षेत्रात एक फॅसिलिटेशन सेंटर उभारण्याबाबत प्रस्तावीत करण्यात आले आहे. तसेच सदर प्रस्तावात अधिनियमाच्या कलम २४(३) अन्वये ५ टक्के प्रशासकीय खर्चाची अट शिथिल करण्याबाबत देखील विनंती करण्यात आलेली आहे. सदर फॅसिलिटेशन सेंटरमध्ये प्रत्येकी १ सहायक कामगार आयुक्त, १ सरकारी कामगार अधिकारी व ७/८ कर्मचारी असा स्टाफ प्रस्तावित करण्यात आला आहे. सदर पत्रास केंद्रशासनाची मान्यता मिळाल्यानंतर याबाबत कार्यवाही करता येईल असे ही मा. कामगार आयुक्तांनी सांगितले. त्याचप्रमाणे मंडळा विरोधी दाखल झालेल्या एका जनहित याचिकेमध्ये मा. उच्च न्यायालयाने बांधकाम कामगारांसाठी अशा प्रकारचे फॅसिलिटेशन सेंटर उभारण्यात यावे असे सूचविले आहे. यापूर्वीच्या बैठकीत ठरल्याप्रमाणे अशा प्रकारचा प्रस्ताव केंद्रशासनास पाठविण्यात आलेला आहे. अशा फॅसिलिटेशन सेंटरचा बांधकाम कामगारांना फायदा होईल. यावर सर्व उपस्थितांनी सहमती दर्शवत वरीलप्रकारे फॅसिलिटेशन सेंटर उभारण्याचा ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला.

**विषय क्र. ६) : महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळासाठी कायदेशीर सल्लागाराची कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करणे.**

उपरोक्त विषयाबाबत बोलताना मा. अध्यक्षांनी मंडळासाठी कायदेशीर सल्लागार नियुक्त करण्याची गरज आहे का? असे विचारले असता मा. कामगार आयुक्त यांनी सध्या काही गरज नाही असे सांगितले, त्यास सर्वांनी सहमती दर्शविली.

**विषय क्र. ७) : महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळासाठी कार्यालय घेण्यासाठी निकष ठरविणे.**

मंडळाचे कामगार प्रतिनिधी श्री.कुटासकर यांनी कामगार कल्याण मंडळाचे कार्यालयामध्ये महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळासाठी जागा उपलब्ध करुन मिळते का, हे तपासावे असे सुचविले. यावर सदर मंडळाचे कार्यालय

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळासाठी उपलब्ध करण्याच्या प्रक्रीयेस जास्त कालावधी लागेल, त्यापेक्षा मंडळासाठी ई-निविदाद्वारे भाडे तत्वावर कार्यालय घेण्यात यावे. असे मा. अध्यक्ष यांनी सुचविले. यावर उपसमितीने मंडळासाठी कार्यालय घेण्याची ई-निविदा प्रक्रिया पूर्ण करावी असे सर्वानुमते ठरले. तसेच ई-निविदाद्वारे निवड केलेल्या जागेचे दर सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडून प्रमाणित करुन घ्यावे, असेही सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ८) : महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळासाठी पूर्ण वेळ सचिवांची नियुक्ती करणे.**

मंडळासाठी पूर्ण वेळ सचिवांची नियुक्ती ही बाब अत्यावश्यक असल्याने मागील बैठकीत कामगार विभागातील सर्व अप्पर कामगार आयुक्त/ कामगार उपआयुक्त/ सहायक कामगार आयुक्त यांच्याकडून पूर्ण वेळ सचिव म्हणून काम करण्यास इच्छुक असणा-या अधिका-यांकडून संमतीपत्रक मागविण्याचे ठरले होते. असे पत्र पाठविण्यात आले का व त्यावर किती सदस्यांची समंती आली अशी विचारणा मा.अध्यक्ष यांनी केली. यावर मा. कामगार आयुक्त असे म्हणाले की, अशा प्रकारचे पत्र संबंधित अधिका-यांना पाठविण्यात आले होते. त्यावर, फक्त श्री. आडे (सहायक कामगार आयुक्त, अमरावती) यांची संमती आलेली आहे, असे सांगितले. तसेच मा. कामगार आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, श्री. आडे हे यापूर्वी रेल्वे बोर्ड या माथाडी मंडळावर अध्यक्ष होते. त्यावेळी माथाडी बोर्डाच्या ३ कोटी रकमेची गुंतवणुक प्रकरणी त्यांच्या निष्काळजीपणामुळे मंडळास रू.१.५ कोटींचे नुकसान झालेले आहे. बांधकाम मंडळाचा एकूण निधी रु.३००० कोटी पेक्षा जास्त आहे. अशा ठिकाणी श्री. आडे यांची सचिव पदावर नियुक्ती करणे योग्य होणार नाही. मा. संचालक (लेखा व कोषागरे) यांनी सांगितले की, त्यांचे प्रामाणिक मत आहे की, अशा व्यक्तीची बांधकाम मंडळाच्या सचिव पदावर नियुक्ती करणे योग्य होणार नाही. तथापि, श्री. आडे यांचे रेल्वे बोर्डावर अध्यक्षपदी नियुक्ती असताना त्यांच्याकडून झालेल्या चुकांची शिक्षा म्हणून त्यांची बदली करण्यात आलेली आहे. त्यामुळे त्यांचा प्रस्ताव विचारात घेऊ नये, असे मा. कामगार आयुक्त यांनी सांगितले. त्यावर मा. अध्यक्ष असे म्हणाले की, श्री. आडे यांची नियुक्ती करणे योग्य नसेल तर इतर अधिका-यांपैकी एका अधिका-याची मंडळावर तात्काळ सचिव म्हणून नियुक्ती करण्यात यावी. ते असेही म्हणाले की, आपण प्रत्येक वेळी अधिका-यांना त्यांची इच्छा, त्यांची सहमती विचारली तर मंडळावर कोणीही अधिकारी येण्यास तयार होणार नाही व मंडळास कधीही पूर्ण वेळ सचिव मिळणार नाही, यावर मा.कामगार आयुक्त असे म्हणाले की, मंडळावर पूर्ण वेळ सचिव म्हणून

महसूल विभागातील उपजिल्हाधिकारी / अप्पर जिल्हाधिकारी पदावरील व्यक्ती नियुक्ती करणे योग्य होईल. त्यावर मा.अध्यक्षांनी त्यास कीती कालावधी लागेल अशी विचारणा केली असता मा.कामगार आयुक्तांनी असे सांगितले की. पुण्याचे उपजिल्हाधिकारी श्री. आर.टी.शिंदे यांचे मंडळावर पूर्ण वेळ सचिव म्हणून येण्याबाबत संमतीपत्रक शासनास सादर करण्यात आलेले आहे. याबाबत मा. प्रधान सचिव (कामगार) यांच्याशी देखील चर्चा झालेली आहे. तसेच मा. प्रधान सचिव (कामगार) हे मा. प्रधान सचिव (महसुल) यांच्याशी देखील बोलले आहेत. यावर मालक प्रतिनिधी श्री. मगर असे म्हणाले की, श्री. शिंदे यांच्या प्रस्तावावर मा. मुख्यमंत्री महोदयांचा शेरा मिळाल्यास त्यांची नियुक्ती तात्काळ होऊ शकेल. त्यास कामगार प्रातिनिधी श्री. भुताड यांनी अनुमोदन दिले. त्यानुसार श्री. शिंदे यांचे मंडळावर पूर्ण वेळ सचिव म्हणून नियुक्ती करण्यासाठी मा. अध्यक्षांनी मा.मुख्यमंत्री महोदय यांना विनंती करावी, असे सर्वानुमते ठरले. सदर प्रस्तावास मान्यता मिळाल्यास, श्री. शिंदे यांची मंडळाचे सचिव म्हणून तात्काळ नियुक्ती करावी, असेही सर्वानुमते ठरले. तसेच श्री. शिंदे यांचे नावास काही अडचणी येत असल्यास इतर उपजिल्हाधिकारी / अप्पर जिल्हाधिकारी यांची संमती असल्यास त्यांच्या बाबतीतही विचार करावा, असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ९) : महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या जिल्हा कार्यालयांना बाहय यंत्रणद्वारे अधिक मनुष्यबळ पुरविणे.**

महाराष्ट्र शासनाने इमपॅनल केलेल्या कंपनी मार्फत एक लिपिक व एक डाटा एन्ट्री ऑपरेटर प्रत्येक जिल्हा कार्यालयात कंत्राटी पध्दतीने पुरविण्यात आलेले आहेत, असे सचिव यांनी सर्व उपस्थितांच्या निदर्शनास आणून दिले. यावर मा. अध्यक्ष असे म्हणाले की, सदर कर्मचा-यांकडून मंडळाच्या कामकाजापेक्षा इतर कामेच करून घेण्यात येत आहे व त्यामुळे मंडळाचे काम व्यवस्थित व वेळेत पूर्ण होत नाही. असे असल्याने मंडळाच्या जिल्हा कार्यालयांना शासनाने इमपॅनल केलेल्या कंपनी मार्फत अजून ५/५ कर्मचारी कंत्राटी पध्दतीने देण्यात यावेत, असे मा. अध्यक्ष यांनी प्रस्तावित केले. या कर्मचा-यांकडून मंडळांतर्गत बांधकाम कामगारांच्या नोंदणीचे काम करुन घेता येईल. तसेच जिल्हा स्तरावर शिबिर आयोजित करुन मंडळाच्या योजनांची माहिती कामगारांपर्यंत पोचविण्यास त्यांची मदत होईल. यावर, मा. कामगार आयुक्त यांनी सध्या जिल्हा कार्यालयात २ कर्मचारी नियुक्त केले आहेत व अजून ५ कर्मचारी दिल्यास प्रशासकीय खर्चाची मर्यादा आड येवू शकते. त्यामुळे सध्या अजून ३ कर्मचारी प्रत्येक जिल्हा कार्यालयास वाढवून देणे योग्य राहील, असे मत मांडले. त्यानुसार सर्व जिल्हा कार्यालयांस प्रत्येकी एक लिपिक, एक डेटा एन्ट्री ऑपरेटर व एक कनिष्ठ लेखाकार, सर्व विभागीय कार्यालयांस प्रत्येकी एक लिपिक,

एक डेटा एन्ट्री ऑपरेटर व एक कनिष्ठ लेखाकार, मंडळाच्या मुंबई येथील मुख्यालयासाठी दोन लिपिक, दोन डेटा एन्ट्री ऑपरेटर, दोन कनिष्ठ लेखाकार, दोन इंग्रजी स्टेनो, दोन मराठी स्टेनो व दोन शिपाई तसेच मा. अध्यक्षांसाठी एक लिपिक/स्वीय सहायक व त्यांचे नागपूर येथील कामकाज बघण्यासाठी एक लिपीक व एक डेटा एन्ट्री ऑपरेटर असे कर्मचारी बाहय यंत्रणेद्वारे नियुक्त करण्याचा ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला.

**विषय क्र. १०) : मा. अध्यक्षांच्या स्थानिक वाहन खर्चास मान्यता देणेबाबत.**

मा. अध्यक्ष यांना मुंबईतील स्थानिक प्रवासासाठी भाडे तत्वावर वेळोवेळी वाहन पुरविण्यात आले असल्याचे सचिव यांनी सर्व उपस्थितांच्या नजरेस आणून दिले. त्याचे देयक रु.१ लाख ४० हजार यास सर्वानुमते मान्यता देण्याची त्यांनी सर्वांना विनंती केली. त्यानुसार मा. अध्यक्षांच्या मुंबई येथील स्थानिक वाहन खर्च रु. १ लाख ४० हजार देयकास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

**विषय क्र. ११) : मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणारे आयत्या वेळेचे विषय.**

मा. अध्यक्ष यांनी मा. कामगार आयुक्त यांना अशी विचारणा केली की मंडळाचे वित्तीय अधिकार मा. अध्यक्ष यांना न देण्याबाबत मा. कामगार आयुक्त यांनी पत्रव्यवहार का केला? तसेच वित्तीय अधिकार मा. अध्यक्षांना दयावयाचे नसतील तर ते कोणास दयावे, असेही त्यांनी विचारले. यावर मा. कामगार आयुक्त यांनी असे सांगितले की, सदर पत्र हे त्यांनी प्रशासकीय बाब म्हणून दिले आहे. यावर मा.अध्यक्ष यांनी इतर मंडळामध्ये वित्तीय अधिकार कोणास आहेत, अशी विचारणा केली. यावर मा. कामगार आयुक्तांनी इतर सर्व मंडळामध्ये देखील वित्तीय अधिकार हे प्रशासकीय अधिका-यांनाच देण्यात आलेले आहेत. असे सांगितले. यावर मालक कामगार प्रतिनिधी श्री. कुटासकर व मालक प्रतिनिधी श्रीम. आपटे यांनी असे निर्णय घ्यावयाचे होते तर ते मंडळासमोर का मांडण्यात आले नाहीत, असे विचारले. यावर मा. संचालक (लेखा व कोषागारे) यांनी मंडळाचे वित्तीय अधिकार प्रशासकीय अधिका-यांनाच असावेत, असे मत मांडले. मा. कामगार आयुक्त यांनी असे सांगितले की, सदर विषयावर शासन स्तरावरून ८ दिवसांत निर्णय मिळेल. यावर मा. अध्यक्ष असे म्हणाले की, मंडळाचे वित्तीय अधिकार सध्या कोणासही नसल्याने मंडळाचे सर्व काम खोळंबून राहिले आहे. म्हणून जोपर्यंत शासनाचे आदेश येत नाहीत तोपर्यंत पूर्वीच्या अध्यक्षांप्रमाणे मंडळाच्या सध्याच्या अध्यक्षांना मंडळाचे सर्व वित्तीय अधिकार देण्यात यावेत, असे सुचविले. त्यास सर्व उपस्थितांनी मान्यता दर्शविली. यावर

मा. संचालक (लेखा व कोषागार) असे म्हणाले की, वित्तीय अधिकार हे संपूर्ण मंडळाचे असतात. तथापि, मंडळाच्या वतीने एक अधिकारी त्यावर स्वाक्षरी करतो व स्वाक्षरी करणारे अधिकारी हे शासनाच्या सेवेतीलच असावेत. यावर मा. अध्यक्ष असे म्हणाले की, याबाबत शासनाचे वेगळे आदेश आले तर ते त्यावेळी ठरविण्यात येईल. त्यामुळे सध्या असणा-या मंडळाच्या अध्यक्षांना सर्व वित्तीय अधिकार प्रदान करणेच योग्य राहील, असे मा. अध्यक्ष म्हणाले. त्यानुसार मंडळाच्या अध्यक्षांना मंडळाचे सर्व वित्तीय अधिकार प्रदान करण्याचा प्रस्ताव शासनास पाठविण्याबाबत ठराव बहुमताने मान्य करण्यात आला.

बैठकीच्या शेवटी मा. अध्यक्षांनी सर्वांचे आभार मानून बैठक अनिश्चित कालावधीसाठी समाप्त केली.

---------------------------

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर
बांधकाम कामगार कल्याणकारी
मंडळ, मुंबई-४०० ०५१.